सामना

# 'एल डोरॅडो'मधून संगीत, नृत्य, जलरंग चित्रांच्या मिलाफाचे होणार अनोखे दर्शन



पुणे, दि. १९ (प्रतिनिधी) - 'रेणू फोरम फॉर द आर्ट्स' या अमेरिकास्थित चॅरिटेबल संस्थेतर्फे पुण्यात पहिल्यांदाच 'एल डोरॅडो' हा कार्यक्रम सादर होत आहे. खिळवून ठेवणारी कथा, आनंदाच्या शोधात निघालेल्या एका सुंदर मुलीच्या यात्रेतून संगीत-नृत्याच्या आधारे दिलेला अमोल संदेश, जलरंग-चित्रांचे चित्तवेधक डिजिटल नेपथ्य, प्रभावी प्रकाशयोजना यांच्या मिलाफातून ही कलाकृती श्रोत्यांना एक अविस्मरणीय अनुभव देईल.

हा कार्यक्रम शनिवारी (दि. २१) रात्री ९ वाजता अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात होणार आहे. यासंदर्भात माहिती देताना संस्थेच्या संस्थापक अनिता कुलकर्णी म्हणाल्या, "एल डोरॅडो हा हिंदुस्थानी फ्युजन संगीत व ओडिसी नृत्यशैलीवर आधारित, असा दीड तासांचा हा कार्यक्रम आहे. अभिजात हिंदुस्थानी कला आणि नृत्यसंगीतावर आधारित कलाकृती जागतिक मंचावर आणण्यासाठी रेणू फोरम फॉर द आर्ट्स संस्था कार्यरत आहे. आम्ही पॅनोरमा, सेलेस्टीया, मीट मी ऑन द मेडो, निर्मोही, गंधार हे कार्यक्रम आंतरराष्ट्रीय मंचावर सादर केले आहेत.

Pune Edition
Jan 20, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com